# मेट्रो ३ नंतर मुंबई मेट्रो रेलकडे मेट्रो ११ची धुरा



। मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ भुयारी मार्गाचे कार्यचलन अत्यंत यशस्वीरीत्या करण्यात येत आहे. त्यामुळेच मेट्रो ३ नंतर वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो ११ मार्गाच्या कामाची धुरा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अर्थात एमएमआरसीएलकडे सोपवण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सध्या वडाळा-ठाणे कासारवडवली मेट्रो ४ व विस्तारित गायमुखपर्यंतचा मेट्रो मार्ग ४ अ सुरू आहे. मात्र या मेट्रोच्या दक्षिणेकडील विस्ताराचे काम म्हणजेच वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे काम राज्य सरकारने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडे सोपवण्याचा निर्णय घेतल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. सध्या मेट्रो ११ चे काम केवळ कागदावरच असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. कोस्टल रोड, पूर्व मुक्त मार्ग जोडण्याचा प्रस्ताव असून मेट्रो ११ काही प्रमाणात भुयारी तर काही प्रमाणात उन्नत उभारण्यात येणार आहे. दक्षिण मुंबईतील वडाळ्यासह शिवडी, कॉटन ग्रीन, रे रोड परिसरात मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जमिनी आहेत. या भूखंडावरील विविध बांधकामाच्या परवानग्यासाठी केंद्राकडे साकडे घालावे लागणार आहे. या भूखंडाच्या हस्तांतरणाची परवानगी नसल्यानेच प्रकल्पाचा आराखडा अजूनही अंतिम करण्यात आलेला नाही. त्यामुळे भविष्यात भुयारी मेट्रो मार्गाचा अनुभव असलेल्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनलाच मेट्रो ११ च्या कामाची धुरा सांभाळावी लागण्याची शक्यता आहे. भुयारी मेट्रो मार्गातील आव्हाने, अडचणी यावर मात करून कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ चे काम डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने समोर ठेवले आहे. १२.७० किमी लांबीच्या मेट्रो ११ साठी एमएमआरडीएने ८ हजार ७३९ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. जपान आंतरराष्ट्रीय एजन्सीकडून या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.